# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मंगळवार दि. १८ मे २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२७ वी बैठक मंगळवार दि.१८ मे २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा.श्री.प्रकाश पाठक | उप सचिव/गृहनिर्माण विभाग |
| ३) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ४) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ५) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ७) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ९) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १०) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ११) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | कार्यकारी अभियंता/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १६) | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १७) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस मा.उपसभापती यांनी मंडळामध्ये काही नवीन अधिकारी आलेले आहेत, त्यांनी आपापली ओळख करुन द्यावी, असे सांगितले. श्रीमती शेंडे यांनी उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) या पदाचा तर श्री.साहू यांनी सहमुख्य अधिकारी,दुवपु.मंडळाचा कार्यभार घेतला असल्याचे सांगितले. तसेच श्री.लोहकरे यांची उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.येथे बदली झाल्याचे सांगण्यात आले. या सर्व अधिका-यांनी त्यांची ओळख करुन दिली. या सर्वांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. त्यानंतर बैठकीच्या कामकाजास सचिव यांनी सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १२७.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.१७/०४/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १५ वर सादर करण्यात आले.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.शंकर पार्टे यांच्या प्रकरणी श्री.लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी मागील बैठकीत सांगितल्याप्रमाणे पाठपुरावा केला का ? कार्यकारी अभियंता यांचेकडे अभिलेख नसेल तर त्यांना बृहतसूचीवर घेता येते किंवा नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, संक्रमण शिबीरात वास्तव्यास असणा-या सर्व उपकरप्राप्त इमारतींच्या भाडेकरु/रहिवाशांची इमारत निहाय सर्व माहिती संगणीकृत करण्याचे काम या महिनाअखेर पर्यंत पूर्ण होत आहे. ती माहिती व इतर आवश्यक ती माहिती/चौकशी करुन अशा प्रकरणी निर्णय घेणे शक्य होणार आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कम्युनिटी हॉल उपलब्ध करुन देण्याबाबत काय झाले अशी विचारणा केली. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी यांना कुर्ला येथील स्वॉनमिल व न्युहिंद मिल यांच्या जमीनीवर बांधण्यात येत असलेल्या संक्रमण शिबीर इमारतीच्या तळ मजल्यावर प्रत्येकी एक याप्रमाणे दोन कम्युनिटी हॉल बनविणेबाबत प्रस्ताव तयार करुन त्याचा मुंबई मंडळ/एस.आर.डी.कडे पाठपुरावा करण्यास सांगितले. मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी भाडेवसुलीकार भाडे घेण्याकरीता येत नाहीत तरी बँकेमार्फत भाडेवसुलीचे पुढे काय झाले, अशी विचारणा केली असता मा.मुख्य अधिकारी यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत मुख्य लेखा अधिकारी यांना पाठपुरावा करण्यास सांगितले. संक्रमण शिबीरातील भाडेकरु/रहिवाशांची संकलित केलेली माहिती संगणीकृत होईपर्यंत अशा गाळ्यात राहणा-या रहिवाशांची माहिती फलकावर लावण्याबाबतचे काम सध्या थांबवलेले आहे. पुनर्रचित इमारतीत फलक लावण्याचे काम चालू आहे. सर्व कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या प्रगतीची माहिती दिली. मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना फलक लावण्याच्या कामास प्राधान्य द्यावे असे सांगितले.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सदस्यांच्या नावाचा फलक भवनामध्ये लावण्याबाबत सूचना केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी मुंबई मंडळाप्रमाणे मा.सदस्यांच्या नावाचा फलक लावून घेण्यात यावा अशा सूचना निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु.मंडळ यांना दिल्या.

तसेच पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एका रहिवाशाच्या नावे बाजुबाजूचे दोन गाळे असल्यास त्यांचे एकूण क्षेत्रफळ विचारात घेऊन एकच गाळा दिला जातो परंतु असे गाळे बाजूबाजूला नसतील व वेगवेगळ्या ठिकाणी असतील तर दोन वेगवेगळे गाळे दिले जातात. ह्या बाबत मार्गदर्शक तत्वे शासनाच्या विचाराधीन असून, त्याला मान्यता मिळविण्यासाठी पाठपूरावा केला जाईल, असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अद्ययावत माहितीची सी.डी.तयार करण्याचे काम चालू आहे, असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

पान क्र.४ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी तांबेकर स्ट्रीट/ईस्त्राईल मोहल्ला या इमारतीचे प्रॉपिंगचे काम सुरु असून प्रॉपिंगसाठी जे साहित्य वापरले आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे कि चांगल्या दर्जाचे आहे, याची तपासणी केली का, अशी विचारणा श्री.लोहकरे, उपमुख्य अभियंता यांना केली. त्यावर श्री.लोहकरे यांनी सांगितले की,तपासणी केली असून प्रॉपिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य हे चांगल्या दर्जाचे असल्याचे सांगितले.

पान क्र.४ वरील परिच्छेद क्र.४ मध्ये मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अपाघातग्रस्तांना मदत करण्यासाठी जी मंडळाने रु.२५ लाखांची तरतूद केली होती व धोरण ठरविले होते, ते प्राधिकरणाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आले का, अशी विचारणा केली. त्यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर बाब प्राधिकरणाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आली असता, ती नामंजूर करण्यात आली आहे.

पान क्र.४ वरील परिच्छेद क्र.५ मध्ये मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी डिझॅस्टर मॅनेजमेंट बाबतचे पुस्तक अपडेट करुन त्याची प्रत देण्याबाबत केलेल्या सूचनेबाबत विचारणा केली असता, सचिव यांनी डिझॅस्टर मॅनेजमेंटचे पुस्तक अपडेट करण्याचे काम सुरु असून लवकरात लवकर सदर पुस्तक सन्मा.सदस्यांना देण्यात येईल, असे सांगितले.

तसेच पान क्र.४ वरील शेवटच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी गाळे विक्रीबाबत जो ठराव झाला होता, तो प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात आला का, अशी विचारणा केली. त्यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर ठराव प्राधिकरणाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आला असता, सदर ठराव नामंजूर करण्यात येऊन असे सर्व गाळे/सदनिका विक्रीसाठी मुंबई मंडळाकडे वर्ग करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतल्याचे सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती करण्याची नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १२७.२**

विषय - इ.क्र.१-३ अरब हाऊस, खेतवाडी १३ वी लेन, डी-२ विभाग म्हाड अधिनियम क्र.८८ (३) (अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १७ ते १९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०७६**

इ.क्र.१-३ अरब हाऊस, खेतवाडी १३ वी लेन, डी-२ विभाग म्हाड अधिनियम क्र.८८ (३) (अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.३ (१)**

विषय - रु.२०००/- प्रती चौ.मी.ची मान्यता देण्याबाबत.
इ.क्र.४९-४९-ओ/५, १ली गल्ली, परिमंडळ-३

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२१ ते २३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०७७**

इ.क्र.४९-४९-ओ/५, १ली गल्लीच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.३ (२)**

विषय - रु.२०००/- प्रती चौ.मी.ची मान्यता देण्याबाबत.
इ.क्र.१४,कामाठीपुरा, १२ वी गल्ली, परिमंडळ-३

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२५ ते २७ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०७८**

इ.क्र. इ.क्र.१४,कामाठीपुरा, १२ वी गल्लीच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.३ (३)**

विषय - रु.२०००/- प्रती चौ.मी.ची मान्यता देण्याबाबत.
इ.क्र.३८९-३९५,शेख मेमन स्ट्रीट, परिमंडळ-१

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२९ ते ३३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०७९**

इ.क्र.३८९-३९५,शेख मेमन स्ट्रीटच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.४**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भुकर पहाणी क्र.१६१-सी/१०, १६१-डी/१० व १६१-ई-/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६२-सी, १६२-डी व १६२-ई दादर माटुंगा इस्टेट इ.क्र.८०, ८२ व ८४-८४-अे, वीन्सेन्ट रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ **'पुनीत स्मृती', 'मीनाक्षी' व 'मोहन मनोर'** (फ-उत्तर विभाग)
२. भुकर पहाणी क्र.८७७, ८७८ फोर्ट विभाग, **इ.क्र.२७ व इ.क्र.२९** पोलीस कोर्ट लेन.(अ विभाग)
३. अंतिम भुखंड क्र.४१६-टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र.४९, गोखले रोड, दादर (प), मुंबई-२८, येथील 'वरदाई बील्डींग' (ग-उत्तर विभाग)
४. भुकर पहाणी क्र.३३४३, भुलेश्वर विभाग, इ.क्र.९८-१०६, निजाम स्ट्रीट (सी-विभाग)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३५ ते ४९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८०**

मुंबई बेटावरील खालील ४ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.१६१-सी/१०, १६१- डी/१० व १६१-ई-/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६२-सी, १६२-डी व १६२-ई दादर माटुंगा इस्टेट इ.क्र.८०, ८२ व ८४-८४-अे, वीन्सेन्ट रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९ 'पुनीत स्मृती', 'मीनाक्षी' व 'मोहन मनोर' (फ-उत्तर विभाग)

२. भुकर पहाणी क्र.८७७, ८७८ फोर्ट विभाग, इ.क्र.२७ व इ.क्र.२९ पोलीस कोर्ट लेन.(अ विभाग)

३. अंतिम भुखंड क्र.४१६-टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र.४९, गोखले रोड, दादर (प), मुंबई-२८, येथील 'वरदाई बील्डींग' (ग-उत्तर विभाग)

४. भुकर पहाणी क्र.३३४३, भुलेश्वर विभाग, इ.क्र.९८-१०६, निजाम स्ट्रीट (सी-विभाग)

<u>आयत्यावेळेचे विषय</u>

**बाब क्रमांक - १२७.४**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

५. भुकर पहाणी क्र.११८७, मांडवी विभाग, इ.क्र.७७, मेमनवाडा रोड, मुंबई **ब विभाग.**

६. भुकर पहाणी क्र.४३, ताडदेव विभाग इ.क्र.३८-४०, नौशिर भरुचा मार्ग, मुंबई ४००००४ येथील **"मिस्त्री बिल्डिंग" डी-२ विभाग.**

७. भुकर पहाणी क्र.१३३८, मांडवी विभाग, इ.क्र.७२-७४, कांबेकर स्ट्रीट, मुंबई येथील **"बटाटावाला बिल्डींग" 'ब' विभाग**

८. भुकर पहाणी क्र. १८२० मांडवी विभाग इ.क्र.१-१३ निशानपाडा रोड मुंबई **ब विभाग.**

९. भुकर पहाणी क्र.५२५, माझगाव विभाग, उपकर क्र. इ-६४८२(१सी), इ.क्र.१२अे-३२बी, म्हातारपाखाडी रोड, मुंबई ४०० ०१० येथील **"ताम्बावाला इमारत" ई-१ विभाग.**

१०. भुकर पहाणी क्र.३२० माझगांव विभाग, इ.क्र.१२० म्हातारपाखाडी रोड मुंबई येथील **"घुले मेंशन" ई-१ विभाग.**

११. भुकर पहाणी क्र. ५/७८ माहिम विभाग व अंतिम भुखंड क्र. ११७० टी. पी. एस. ४ माहिम विभाग, इमारत क्र. ८८९, काशीनाथ धुरु रोड, दादर (पश्चिम) मुंबई-२८ **"गोपाळ भुवन" ग/उत्तर विभाग.**

१२. भुकर पहाणी क्र.१०/१८७६, भायखाळा विभाग, इ.क्र.८, मोतलीबाई स्ट्रिट, डॉ.ए.आर.नायर मार्ग, आग्रीपाडा, मुंबई ४०००११ येथील **"दिलशाद बिल्डींग" ई-२ विभाग.**

१३. भुकर पहाणी क्र.६८६, माझगाव विभाग, इ.क्र.४८-४८ए, मुंबई **ई-१ विभाग.**

१४. अंतिम भुखंड क्र.४५९-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इ.क्र.१०६ व १०-डी, के.डब्लु चीतळे पथ, दादर (प) मुंबई-२८ **"वसंत भवन" ग-उत्तर विभाग.**

१५. भुकर पहाणी क्र.३३१ गिरगाव विभाग, इ.क्र.३५-डी-१० व ३५-डी-१०ए, मुघभाट क्रॉस लेन मुंबई येथील **"चव्हाण बिल्डींग" डी-१ विभाग.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १११ ते १५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८०**

मुंबई बेटावरील खालील ११ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

५. भुकर पहाणी क्र.११८७, मांडवी विभाग, इ.क्र.७७, मेमनवाडा रोड, मुंबई **ब विभाग.**

६. भुकर पहाणी क्र.४३, ताडदेव विभाग इ.क्र.३८-४०, नौशिर भरुचा मार्ग, मुंबई ४००००४ येथील **"मिस्त्री बिल्डिंग" डी-२ विभाग.**

७. भुकर पहाणी क्र.१३३८, मांडवी विभाग, इ.क्र.७२-७४, कांबेकर स्ट्रीट, मुंबई येथील **"बटाटावाला बिल्डींग" 'ब' विभाग**

८. भुकर पहाणी क्र. १८२० मांडवी विभाग इ.क्र.१-१३ निशानपाडा रोड मुंबई **ब विभाग.**

९. भुकर पहाणी क्र.५२५, माझगाव विभाग, उपकर क्र. इ-६४८२(१सी), इ.क्र.१२ए-३२बी, म्हातारपाखाडी रोड, मुंबई ४०० ०१० येथील **"ताम्बावाला इमारत" ई-१ विभाग.**

१०. भुकर पहाणी क्र.३२० माझगांव विभाग, इ.क्र.१२० म्हातारपाखाडी रोड मुंबई येथील **"घुले मेंशन" ई-१ विभाग.**

११. भुकर पहाणी क्र. ५/७८ माहिम विभाग व अंतिम भुखंड क्र. ११७० टी. पी. एस. ४ माहिम विभाग, इमारत क्र. ८८९, काशीनाथ धुरु रोड, दादर (पश्चिम) मुंबई-२८ **"गोपाळ भुवन" ग/उत्तर विभाग.**

१२. भुकर पहाणी क्र.१०/१८७६, भायखळा विभाग, इ.क्र.८, मोतलीबाई स्ट्रिट, डॉ.ए.आर.नायर मार्ग, आग्रीपाडा, मुंबई ४०००११ येथील **"दिलशाद बिल्डींग" ई-२ विभाग.**

१३. भुकर पहाणी क्र.६८६, माझगाव विभाग, इ.क्र.४८-४८ए, मुंबई **ई-१ विभाग.**

१४. अंतिम भुखंड क्र.४५९-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इ.क्र.१०६ व १०-डी, के.डब्लु चीतळे पथ, दादर (प) मुंबई-२८ **"वसंत भवन" ग-उत्तर विभाग.**

१५. भुकर पहाणी क्र.३३१ गिरगाव विभाग, इ.क्र.३५-डी-१० व ३५-डी-१०ए, मुघभाट क्रॉस लेन मुंबई येथील **"चव्हाण बिल्डींग" डी-१ विभाग.**

उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

**बाब क्रमांक - १२७.५**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग/द विभाग) २७ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५१ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १२७/१०८१

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७,२०,५६,१३५/-(रुपये सात कोटी वीस लक्ष छप्पन्न हजार, एकशे पस्तीस फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,२६,७१,६१५/- (रुपये चार कोटी सव्वीस लक्ष एकाहत्तर हजार, सहाशे पंधरा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक - १२७.६

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ/द विभाग) ३४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५९ ते ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १२७/१०८२

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" नुसार एकूण ३४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८,२४,६१,१४६/-(रुपये आठ कोटी चोवीस लक्ष एकसष्ट हजार एकशे सेहेचाळीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,५७,५४,९०६/- (रुपये चार कोटी सत्तावन्न लक्ष चोप्पन्न हजार नऊशे सहा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक - १२७.७

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/उ,ग/उ विभाग) १५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६७ ते ७१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १२७/१०८३

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" नुसार एकूण १५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,९७,५५,७६०/-(रुपये दोन कोटी सत्याण्णव लक्ष पंचावन्न हजार सातशे साठ फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,००,९८,१२९/- (रुपये दोन कोटी अठ्याण्णव हजार एकशे एकोणतीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.८**

विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७३ ते ७५ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८४**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील डी-२ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रु.५,९४,४८०/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.९**

विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-४ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७७ ते ८१ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८५**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-४ मधील ग-उत्तर विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रु.२,०५,५७३/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.१०**

विषय - सन २०१० च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात आढळलेल्या अतिधोकादायक इमारती घोषित करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८३ ते ९५ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते ज्या अतिधोकादायक इमारती आहेत, त्या इमारतींची पहाणी लवकरात लवकर करावी, असे ठरले.

**बाब क्रमांक - १२७.११**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-१ मधील ५८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९७ ते १०५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

९

**ठराव क्रमांक - १२७/१०८६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण ५८ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१०,५८,७१,२४०/-(रुपये दहा कोटी अठ्ठावन्न लक्ष एकाहत्तर हजार दोनशे चाळीस फक्त) एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,१३,७५,५७८/- (रुपये सहा कोटी तेरा लक्ष पंच्याहत्तर हजार पाचशे अठ्ठ्याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.१२**

विषय - नविन चिखलवाडी येथील इ.क्र.१ ह्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत निर्णय घेण्याकरीता.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १०७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८७**

नविन चिखलवाडी येथील इ.क्र.१ मधील संभाव्य दुरुस्तीकरीता अंदाजे रु.७,६३,९४०/- (रु.सात लक्ष, त्रेसस्ट हजार, नऊशे चाळीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.१३**

विषय - शुध्दीपत्रक.
इ.क्र.१७-२१ खारा टँक/९१-१११ पाकमोडीया स्ट्रीट या इमारतीच्या दुरुस्तीबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १०९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०८८**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.१३/०१/२०१० रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीत इ.क्र.१७-२१ खारा टँक/९१-१११ पाकमोडीया स्ट्रीट या इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी रक्कम रु.१०,२१,९६२/- ह्या रक्कमेस देण्यात आली होती. सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम मंजूरी देताना चुकीने रु.१९,१४,९५७/- ऐवजी रु. १०,२१,९६३/- टंकलिखीत केली होती. त्याऐवजी प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.१९,१४,९५७/- इतक्या रक्कमेस तसेच मंजूर केलेल्या प्रशासकीय

मान्यतेची एकूण रक्कम रु.१९,१०,५९,५४८/- ऐवजी प्रशासकीय मान्यतेची एकूण रक्कम रु.१९,१९,५२,५४२/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२७.१४**

विषय - विशेष निधीअंतर्गत मंजूर झालेल्या कामात बदल करण्यास मान्यता देणेबाबत.

मा.आमदार तथा राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या मतदारसंघात विशेष निधी अंतर्गत मंजूर केलेले रावते कंपाऊंड, गणपतराव कदम मार्ग या इमारतीचे काम रद्द करुन त्याऐवजी इ.क्र.लूकमानी लॉज सातरस्ता या इमारतीचे काम करण्यास मान्यता देण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

**ठराव क्रमांक - १२७/१०८९**

मा.आमदार तथा राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या मतदारसंघात विशेष निधी अंतर्गत मंजूर केलेले रावते कंपाऊंड, गणपतराव कदम मार्ग या इमारतीचे काम रद्द करुन त्याऐवजी इ.क्र.लूकमानी लॉज सातरस्ता या इमारतीचे काम करण्यास मान्यता देण्याबाबत मंजूरी प्रदान करण्यात आली.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असे सांगितले की, दक्षिण मुंबईमध्ये सर्वात जास्त उपकरप्राप्त इमारती आहेत, पावसाळा जवळ आलेला आहे ते पाहून नियंत्रण कक्ष कशाप्रकारे सुसज्ज ठेवता येईल याकडे लक्ष द्यावयास पाहिजे. यावर मुख्य अधिकारी यांनी श्रीमती शेंडे यांना नियंत्रण कक्ष व्यवस्थीत व सर्व साधनयुक्त ठेवण्याकरीता स्वतः जातीने लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनी धारावी येथे जे संक्रमण शिबीर बांधलेले आहे, त्यात घुसखोरी झाली आहे का, अशी विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, ग/उ विभाग यांनी सांगितले की, धारावी येथील बांधलेले संक्रमण शिबीर हे नवीन आहे व तेथे कोणतीही घुसखोरी झालेली नाही.

सर्व संक्रमण शिबीरांना मा.सदस्यांनी भेट देण्याचे सूचविले असता या भेटीचे उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) यांनी को-ऑर्डिनेट करावे, असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, काही इमारतींमध्ये अनिवासी गाळे बांधले जात नाहीत, त्यामुळे तेथील रहिवाशांचे असे म्हणणे असते की, त्यांना निवासी गाळे मिळावेत. या बाबत श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, अशा प्रस्तावाची नस्ती मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे पाठविलेली आहे, त्यांचेकडून ती विधी सल्लागार/प्रा.यांचेकडे गेली आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असे सांगितले की, या वर्षी घोषित केलेल्या २४ धोकादायक इमारतींमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक असलेल्या १० इमारतींचा समावेश आहे. त्यामुळे या इमारतींकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. तसेच मा.सदस्यांना नवीन १४ धोकादायक इमारतींना भेट द्यावयाची आहे. त्या अनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता यांनी सर्व उपमुख्य अभियंता व मा.सदस्यांशी चर्चा करुन पहाणीसाठी वेळ निश्चित करावी अशा सूचना मुख्य अधिकारी यांनी दिल्या.

मा.सदस्या श्रीमती उल्का पाटणकर यांनी इंद्रप्रस्थ इमारतीला लावलेला व्याजाचा दर कमी करण्याबाबत सांगितले. यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, अशा

प्रस्तावाची नस्ती मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे पाठविली असता, प्रचलित नियम विचारात घेऊन सदर प्रस्तावास मा.उपाध्यक्ष/प्रा.यांनी मंजूरी नाकारलेली आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सर्व सदस्यांना एम.आय.जी.क्लबचे सदस्यत्व मिळण्याबाबतच्या प्रस्तावाचे काय झाले, अशी विचारणा केली. त्यावर सदर बैठकीत ठराव करुन निवासी कार्यकारी अभियंता यांनी पाठपुरावा करण्याचे ठरले.

**बाब क्रमांक - १२७.१५**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन्मा.सदस्यांना एम.आय.जी.क्लबचे सदस्यत्व मिळणेबाबत मुंबई मंडळास प्रस्ताव पाठविण्याबाबत.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन मा.सदस्य यांनी एम.आय.जी.क्लबच्या सदस्यत्वासाठी लागणारी फी ते स्वतः भरण्यास तयार असल्याचे सांगितले व सदर प्रस्ताव तयार करुन मुंबई मंडळास पाठविण्याकरीता मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०९०**

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन सर्व मा.सदस्य यांनी एम.आय.जी.क्लबच्या सदस्यत्वासाठी लागणारी फी ते स्वतः भरण्यास तयार असल्याचे सांगून सदर प्रस्ताव तयार करुन मुंबई मंडळास पाठविण्याकरीता मान्यता प्रदान केली.

तसेच सर्व सन्मा.सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या नावाचा दुरुस्ती मंडळाच्या विविध कार्यक्रम पत्रिकेत समावेश असावा. त्यावर मुख्य अधिकारी यांनी सदर बाबतीत जेव्हा केव्हा कार्यक्रम मंडळातर्फे करण्यात येईल तेव्हा या बाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सन्मा.राष्ट्रवादीचे अध्यक्ष श्री.शरदश्चंद्रजी पवार यांच्या सांगण्यानुसार महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांकाकरीता नवीन बांधण्यात येणा-या विक्री करावयाच्या गाळ्यामध्ये आरक्षण ठेवले आहे, त्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचा आभारी आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सुधारित व्हेकेशन नोटीसच्या मसुद्याबाबत विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, व्हेकेशन नोटीसचा मसुदा निश्चित करणेबाबत तसेच त्या बदलाबाबत प्राधिकरणाच्या मान्यतेअंती पुढील निर्णय घेण्यात येईल, व सदर बाबत सहमुख्य अधिकारी/दुवपु.यांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ